"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 05, Sept. – Oct. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

# मराठी समीक्षेचा उगम

डॉ यशोद श्रीमंतराव पाटील
(सहायक प्राध्यापक मराठी विभाग )
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
समर्थनगर औरंगाबाद

आधी भाषा आणि मग तिचे व्याकरण त्याप्रमाणे आधी साहित्यनिर्मिती आणि मग तिचे व्यवस्थापन. भाषा ही जन्मत:च आपले व्याकरण घेऊन अवतरत असते. तिचे ते अंगभूत व्याकरण लक्षात घेऊन कालांतराने त्याची फक्त पध्दतशीर मांडणी केली जाते, असे भाषा व्याकरण यांच्या संबंधात अधिक यर्थाथपणे म्हणता येईल. साहित्य निर्मितीबद्दल मात्र अशा प्रकारचे विधान काही प्रमाणातच करता येईल. साहित्य सृष्टी बरोबरच साहित्यदृष्टीही आविष्कृत होऊ शकते. आपण जे लेखन करीत आहोत त्याचे प्रयोजन काय या लेखनाची प्रेरणा आपल्यास का झाली या लेखनाचा काय परिणाम हाऊ शकेल व या लेखनाकडे वाचकांनी कोणत्या दृष्टीने पाहावे असा विचार साहित्य निर्मिती करण्यापूर्वी व ती करीत असताना साहित्यिकाच्या मनात उदभवणे शक्य आहे. हे जर खरे असेल तर साहित्य आणि समीक्षा ही एकाच वेळी प्रकट होत असतात असे म्हणता येईल. पण सर्वच साहित्यिक असा सर्वांगीण विचार करून मगच साहित्य निर्मितीकडे वळतात असे म्हणता येत नाही. आपण हे कसे लिहिले व का लिहिले याचे स्पष्टीकरण अनेक साहित्यिकांना देता येत नाही. आतून काही प्रेरण झाल्यामुळे उत्स्फूर्तपणे एक प्रकारच्या बेभान अवस्थेत साहित्य निर्मिती घडून आलेली असते. तिचे तार्किक विश्लेषण लेखकास करणे शक्य होईलच असे म्हणता येत नाही .

पण कोणतीही साहित्यकृती निर्माण झाल्यावर तिचा व त्या लेखकाचा प्रत्यक्ष संबंध संपुष्टात येतो. ती साहित्यकृती व लेखक यामध्ये जन्य जनक संबंध असला तरी ती निर्मिती वाचकांच्या मालकीची होते. त्या साहित्यकृतीचा आस्वाद घ्यायला, तिच्या बद्दल अनुकूल किंवा प्रतिकूल मत व्यक्त करायला वाचक मोकळा असतो. सगळेच वाचक असे मतप्रकटीकरण करतातच असे नाही. काही वाचक करतात. त्यांनाच समीक्षक म्हणून संबोधले जाते. हे सर्व लक्षात घेतले तर आधी साहित्य व मग समीक्षा असे मानणे चुकीचे ठरत नाही.

## मराठी साहित्य निर्मितीचा प्रारंभ

मराठी साहित्याच्या निर्मितीला नेमका प्रारंभ कोणत्या शतकात झाला हे निर्विवाद पणे अजून ठरविता आलेला नाही. आठव्या किंवा नवव्या शतकात मराठी भाषेचा जन्म झाला या निर्णयापरयंत संशोधक आलेले दिसतात. या नंतरची तीन चार शतके मराठीची जडणघडण होण्याची म्हणून मानावी लागतात. मुकुंदराज हे आद्य ग्रंथकार हे मत मान्य केल्यास बाराव्या शतकापासून मराठी साहित्याची निर्मिती सुरू झाली असे म्हणता येते. पण मुकुंदराजाच्या आद्यत्वाबद्दल अजूनही अनेक संशोधकांना शंका वाटते. त्यामुळे तेराव्या शतकापासून मराठी साहित्याचा प्रारंभ झाला असे मानावे लागते.

मराठी समीक्षा मात्र तितकी जुनी नाही. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे या सहा शतकातील साहित्यिकांनी आपल्या निर्मितीबद्दल काही ना काही विचार केला असणे शक्य आहे. केवळ वाचकाच्या किंवा श्रोत्याच्या भूमिकेतून त्या त्या काळातील या साहित्याचा विचार केला असला पाहिजे. पण समीक्षात्मक असे निश्चितपणे म्हणता येईल असे साहित्य एकोणिसाव्या शतकापर्यंत तरी निर्माण झालेले दिसत नाही.

## प्राचीन मराठीतील समीक्षेचे स्वरूप :

प्राचीन काळातील ग्रंथकार आपल्या ग्रंथाच्या प्रारंभी, कधी ग्रंथाचा उपसंहार करताना, काही समीक्षासदृश विचार व्यक्त करतात, हे खरे आहे. आपला ग्रंथ कसा आकारास आला, त्यास कोणाची प्रेरणा कारणीभूत झ ाली, ग्रंथाचे स्वरूप काय आहे, ग्रंथाचे प्रयोजन काय आहे या बद्दल काही विधाने काही ग्रंथकारांनी केली आहेत. ज्यांनी दुसऱ्याच्या निर्मितीबद्दल काही तुरळक अभिप्राय व्यक्त केले आहेत अशीही काही उदाहरणे आहेत.

प्राचीन मराठीमध्ये साहित्य आहे पण समीक्षा नाही ,असे का झाले असावे याची काही कारणे शोधता येतील. ज्या मध्ययुगात प्राचीन मराठी साहित्य निर्माण झाले तो काळ अनेक बाबतीत अशांततेचा व अस्थिरतेचा होता असे दिसून येते. भारतावर व महाराष्ट्रावरही या काळात आक्रमणे झाली, अनेक राजवटी स्थापन झ ाल्या व नाशही पावल्या. दुष्काळ रोगराई व अवर्षण यासारखे संकट व राजकीय बंडाळी आणि लुटालुट असे संकाटाच्या तडाख्यात या काळातील माणसे सापडली होती. ही परिस्थिती बदलण्याचा राजकीय प्रयत्न अर्थातच झाला व मराठेशाहीच्या रूपाने इतिहासात या पराक्रमाची नोंदही झाली. त्या काळी पोथ्या पुराणे वाचता येणे धार्मिक कृत्य करता येणे, प्रसंगाविशषी पत्रव्यवहार करता येणे आणि हिशेब ठेवण्यापुरते गणित येणे एवढीच त्या काळातील शिक्षणाची कक्षा होती आणि असे शिक्षणसुद्धा फारच थोडयांच्या वाटयास येई. बहुसंख्य समाज हा निरक्षरच होता, अशा परिस्थितीत समीक्षा ग्रंथ निर्माण होण्याची परिस्थिती कमीच होती.

## अर्वाचीन कालखंडाचा प्रारंभ

एकोणिसाव्या शतकाची पहिली पंचवीस वर्षे संक्रमणाची आणि नंतरची पंचवीस वर्ष अर्वाचीन काळाच्या जडणघडणीची म्हणून ओळखली जातात. मराठयांच्या सत्तेचा शेवट, संरजामशाहीचाही अस्त, नवीन अंमलदारांच्या वर्गाचा उदय, इंग्रजी शिक्षणाची सुरूवात पुण्यामधली संस्कृत पाठशाळा व नंतर क्रमाने हायस्कूल व कॉलेज अशी शिक्षणाची झालेली सोय, मुद्रणकलेचा महाराष्ट्रात झालेला प्रवेश आणि प्रसार, द्वैभाषिक व नंतर एक भाषिक नियतकालिकांचा प्रारंभ, दळणवळणाच्या आधुनिक व्यवस्थेचा प्रारंभ अशा अनेक गोष्टी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत घडल्या. इंग्रजी विद्येचे संस्कार झालेली एक नवी पिढी रूढ होउ लागली,आणि मुंबई हे सर्व नवीन घडामोडींचे उगमस्थान बनले. मराठी माणसांचा आचार विचार पोषाख नित्यनैमित्तिक व्यवहार या सर्वच बाबतीत झपाटयाने बदल होऊ लागले.

साहित्याच्या संदर्भातही फार लक्षणीय अशी परिवर्तने झाली. कही जुने शाहिर व बखरकार या शतकाच्या पूर्वार्धात होते व त्यांनी जुन्याच पद्धतीचे लेखन केले हे खरे असले तरी शिक्षण, मुद्रण आणि नियतकालिके यांच्या एकत्रित परिणामुळे साहित्याचे स्वरूप सर्वच बाबतीत बदलून गेले. पद्याची जागा आता गद्याने घेतली. एकच

अभ्यासक्रम सर्व शाळांमधून अमलात येऊ लागला. एकच ग्रंथ मुद्रणामुळे एकाचवेळी सगळीकडे पोहोचू लागला. विशिष्ट प्रश्नासंबंधी एकाच वेळी सर्वत्र विचारमंथन सुरू झाले. वृत्तपत्रांमुळे सर्वसामान्य माणसाचे मनोगत प्रथमच सर्वांपुढे येऊ शकले. इंग्रजी विद्या पाश्च्यात्य आचार विचार व संस्कृती, त्यांनी केलेल्या भौतिक सुधारणा यामुळे येथील मोठया वर्गावर त्याची छाप पडली. आपण पाश्च्यात्यासारखे बनले पाहिजे नवे शिक्षण घेतले पाहिजे अशी जाणीव सर्वत्र बळावू लागली. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, नाना शंकर शेठ दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाबा पदमनजी अशा अनेक व्यक्ती एकोणिसाव्या शतकाच्या मध्यार्पंत उदयास आले, हरी केशवजी पाठारे, महादेवशास्त्री कोल्हटकर, परशुरामपंत स.का छत्रे इत्यादी लेखक मंडळींचाही उल्लेख केला पाहिजे. वर्तमान पत्र लिखानाबरोबरच वेगवेगळया शास्त्रासंबंधीची पुस्तके, माहितीपर पुस्तके, तात्पर्य सांगणाऱ्या व नीतिपाठ शिकविणाऱ्या गोष्टी या प्रकारांचे लेखन क्रमाक्रमाने होऊ लागले व रूढ झाले विद्यापिठाच्या स्थापनेनंतर इंग्रजी व संस्कृत, भाषा आणि साहित्य, यांचा पद्धतशीर अभ्यास होऊ लागला. अनेक संस्कृत व इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे होऊ लागली.

साहित्यशास्त्रात शाश्वत महत्त्वाचे काय व तात्कालिक स्वरूपाचे काय याचा शोध घेतला जाऊ लागला. संस्कृत साहित्यशास्त्राचा आणि पाश्च्यात्य टीकाशास्त्राचा अभ्यास सुरू झाला आणि अशा प्रकारे समीक्षा हा सर्वस्वी नवीन प्रकार मराठी साहित्यात आला. अर्वाचीन मराठीत सर्वात आधी असे समीक्षात्मक लेखन कुणी केले हे ठरविणे कठीण आहे. दादोबा पांडुरंगांनी यशोदा पांडुरंगी (१९६५) या नावाचे पुस्तक लिहिले, मोरोपंतांच्या श्लोक केकावलीचे स्पष्टीकरणात्मक विवेचन आणि गुणदोषांची चर्चा असे या पुस्तकाचे स्वरूप आहे परशुराम तात्या गोडबोले यांचा केकादर्शही (१८६७) याच स्वरूपाचा ग्रंथ आहे. विशिष्ट कवीचा परिचय आणि त्याच्या काव्याची चर्चा असा क्रम या समीक्षेच्या प्रारंभापासून दिसून येतो कृष्णशास्त्री राजवाडे यांचा अलंकार विवेक (१८५३) दाजी प्रधान यांचा रसमाधव (१८६८) गणेशशास्त्री लेले यांचा साहित्यशास्त्र अशा प्रकारच्या समीक्षात्मक पुस्तकांचे लेखन या काळात झाले. या प्रमाणे मराठी समीक्षेचा उगम झाला व पुढे विस्तार झाला.

## संदर्भ ग्रंथ

१. साहित्य आणि समाजजीवन - लालजी पेंडसे, न्यू मनोहर प्रिटिंग प्रेस, मंबई.
२. साहित्य निर्मिती आणि समीक्षा - दि. के. बेडेकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
३. साहित्य विचार - दि. के. बेडेकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
४. साहित्य शोध आणि बोध - वा. ल. कुलकर्णी पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
५. साहित्यमीमांसा - रा. शं. वाळिंबे, चित्रशाळा प्रकाशन पुणे.